# उद्योगांच्या विकासासाठी सरकार कटिबद्ध

## केंद्रीय मंत्री अनंत गीते : लघु व मध्यम उद्योग विकास चेंबरतर्फे परिषद

गोकुळ शिरगाव, ता. २१ : औद्योगिक उत्पादन व निर्यातीबरोबरच रोजगार निर्मितीसारख्या क्षेत्रात महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या लघु व मध्यम उद्योगांच्या विकासाकरिता मोदी सरकार कटिबद्ध असल्याची ग्वाही केंद्रीय अवजड उद्योगमंत्री अनंत गीते यांनी दिली.

लघु व मध्यम उद्योग विकास चेंबर ऑफ इंडिया आणि इंडिया इंटरनॅशनल ट्रेड सेंटरतर्फे मुंबईत आयोजित परिषदेच्या उद्घाटन आणि पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. केंद्र सरकारच्या




मुंबई : लघु व मध्यम उद्योग विकास चेंबर ऑफ इंडिया आणि इंडिया इंटरनॅशनल ट्रेड सेंटरतर्फे आयोजित परिषदेचे उद्घाटन करताना केंद्रीय मंत्री अनंत गीते. शेजारी अन्य मान्यवर.

परमाणू ऊर्जा विभागाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, कॅनरा बँकेचे अध्यक्ष आर. के. दुबे, आयुर्विमा महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक एन. बी. मैनाक, स्टेट बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक पी. के. मल्होत्रा, सीडीबीचे व्यवस्थापकीय संचालक एन. के. मैनी आणि लघु व मध्यम उद्योग विकास चेंबर ऑफ इंडियाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत साळुंखे आदी उपस्थित होते.

चंद्रकांत साळुंखे यांनी प्रास्ताविकात देशांतर्गत लघु व मध्यम उद्योगांच्या समस्यांचा आढावा घेत या उद्योगांसमोरील अडचणी मांडल्या.

श्री. गिते आणि काकोडकर यांच्या हस्ते लघु व मध्यम उद्योग विकास चेंबर ऑफ इंडिया आणि इंडिया इंटरनॅशनल ट्रेड सेंटरच्या संयुक्त विद्यमाने स्थापित करण्यात आलेल्या वर्ल्ड एसएमई ट्रेड सेंटरचे आणि कॅनरा बँकेच्या एमएसएमई एक्स्पो टर्म लोन स्किम फॉर एक्स्पोर्ट या विशेष योजनेचा प्रारंभ केला.